12 MAY 2023
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सच्च्या नेतृत्वाची निरपेक्षभाव हीच ओळख

## डॉ. डी. टी. शिर्के यांचे पाचगणी नेतृत्व विकास शिबिरात प्रतिपादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

सच्चे नेतृत्व निरपेक्ष भावनेने लोकांचे कार्य मार्गी लावण्यासाठी धडपडणारे असले पाहिजे, अशी अपेक्षा कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केली.

शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभाग व पाचगणी (ता. वाई, जि. सातारा) येथील बहाई ॲकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १७ व्या तीन दिवसीय नेतृत्व विकास शिबिर उद्घाटन समारंभात ते बोलत होते. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, नेतृत्व केवळ राजकीय इतक्या संकुचित अर्थाने आपण पाहतो, ही चूक आहे. नेतृत्व सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आदी सर्वच क्षेत्रांमध्ये असते. वेगवेगळ्या प्रकारचे नेतृत्व करण्याची क्षमता प्रत्येकामध्ये असते. त्या क्षमतेचा वापर सर्वात आधी स्वतःच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी करण्याची गरज आहे.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागातर्फे पाचगणी येथे आयोजित नेतृत्व विकास शिबिर उद्घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. आलोक जत्राटकर, डॉ. लेसन आझादी.**

बहाई अकादमीचे संचालक डॉ. लेसन आझादी म्हणाले, विद्यार्थी दशेपासूनच सकारात्मक पद्धतीने विविध कला-गुणांचा, नेतृत्व गुणांचा विकास केला पाहिजे. प्रत्येकाने नेताच व्हायला पाहिजे, असे अपेक्षित नसले, तरी प्रत्येक जण एक चांगला माणूस मात्र निश्चितच व्हायला हवे. त्यासाठी आपल्या जगण्याचे, शिक्षणाचे प्रयोजन शोधणे क्रमप्राप्त आहे. प्रास्ताविक विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड यांनी केले.

डॉ. पराग तांदळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रल्हाद माने यांनी आभार मानले. यावेळी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर उपस्थित होते. शिबिरामध्ये ५० विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

12 MAY 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# माहितीपटांतून उलगडले राजर्षी शाहूंचे कार्य

कोल्हापूर, ता. ११ : राजर्षी शाहू महाराज स्मृतिशताब्दी वर्षानिमित्त विद्यापीठाच्या जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन विभागातर्फे 'राजर्षी शाहू महाराज राष्ट्रीय माहितीपट महोत्सव' झाला. मानव्यशास्त्र सभागृहातील या महोत्सवात शाहू महाराजांच्या योगदानावर प्रकाश टाकणारे १९ माहितीपट नोंदविण्यात आले होते. विजेत्या पाच माहितीपटांचे स्क्रीनिंग झाले. विजेत्यांना प्रथम, द्वितीय, विशेष परीक्षक पुरस्कार, छायाचित्रण, संकलन आणि ध्वनी अशा स्वरूपाची पारितोषिके, विद्यापीठाचे सन्मानचिन्ह, रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील अध्यक्षस्थानी होते. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे प्रमुख उपस्थित होते.



**राजर्षी शाहू महाराज स्मृतिशताब्दी वर्ष सांगता**



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील राजर्षी शाहू माहितीपट महोत्सवातील चेतन सूर्यवंशी, समृद्धी पाटील, पल्लवी पाटील व सिमरन ठाणेकर या विजेत्यांना कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते गौरविण्यात आले. डॉ. निशा पवार, शिवाजी जाधव, अनुप जत्राटकर, अनमोल कोठाडिया, सुमेधा साळुंखे, जगदीश गुरव, परशराम पवार उपस्थित होते.**

चेतन सूर्यवंशी यांच्या 'कोल्हापूर ते मिरज रेल्वे' या माहितीपटास प्रथम, समृद्धी पाटील यांच्या 'साठमारी'ला द्वितीय, सोनाली हुंबरे यांच्या 'मोतीबाग तालीम'ला विशेष परीक्षक पुरस्कार व उत्कृष्ट ध्वनी अशी पारितोषिके देण्यात आली. सिमरन ठाणेकर यांच्या 'लक्ष्मी-विलास पॅलेस' आणि पल्लवी पाटील यांच्या 'विचार शाश्वत वसतिगृहांचा' या माहितीपटांना अनुक्रमे उत्कृष्ट छायाचित्रण, संकलन पारितोषिके मिळाली. प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, की राजर्षी शाहू महाराज हे आदर्श नेतृत्वाचे प्रतीक आहेत. या महोत्सवाच्या माध्यमातून शाहूंचे योगदानाचा जागर निश्चित घडून आला आहे. चित्रपट समीक्षक डॉ. अनमोल कोठाडिया, दिग्दर्शक अनुप जत्राटकर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. महोत्सव यशस्वी करण्यासाठी डॉ. शिवाजी जाधव, सुमेधा साळुंखे, परशराम पवार यांनी परिश्रम घेतले. आयोजक डॉ. निशा पवार यांनी प्रास्ताविक केले. पल्लवी पाटील व जावेद तांबोळी यांनी सूत्रसंचालन केले.

**'विद्यार्थ्यांचे कौतुक'**

प्रभारी कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, की लोकोत्तर व्यक्तींचे कर्तृत्व महान असते. निःस्वार्थ भावनेतून समाजहिताचे कार्य अशा व्यक्तींकडून होत असते. असे व्यक्तिमत्त्व म्हणजे शाहू महाराज होत. अशा सर्वगुण संपन्न व्यक्तिमत्त्वांवर माहितीपट निर्मितीचे काम विद्यार्थ्यांनी केल्याबद्दल सर्वांचे कौतुक आहे.

12 MAY 2023
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'कोल्हापूर ते मिरज रेल्वे' माहितीपटाची बाजी

## साठमारी द्वितीय : शिवाजी विद्यापीठात माहितीपट महोत्सव उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन विभागातर्फे गुरुवारी (दि. ११) आयोजित केलेल्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय माहितीपट महोत्सवात चेतन सूर्यवंशी यांच्या 'कोल्हापूर ते मिरज रेल्वे' या माहितीपटाने प्रथम क्रमांक पटकावला.

मानव्यशास्त्र सभागृहात पार पडलेल्या या महोत्सवात शाहू महाराजांच्या योगदानावर प्रकाश टाकणारे १९ माहितीपट नोंदविले होते. विजेत्या पाच माहितीपटांचे स्क्रीनिंग यावेळी झाले. विजेत्यांना सन्मानचिन्ह, रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन



विद्यापीठात पार पडलेल्या राजर्षी शाहू माहितीपट महोत्सवातील विजेत्यांना कुलसचिव डॉ. विलास शिंदे व विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले. यावेळी (डावीकडून) विक्रम रेपे, डॉ. शिवाजी जाधव, अनुप जत्राटकर, अनमोल कोठाडिया, डॉ. सुमेधा साळुंखे, आदी उपस्थित होते.

गौरविले. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील अध्यक्षस्थानी होते, तर प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे प्रामुख्याने उपस्थित होते. महोत्सवात समृद्धी पाटील यांच्या 'साठमारी'ला द्वितीय, सोनाली हुंबरे यांच्या 'मोतीबाग तालीम'ला विशेष परीक्षक पुरस्कार व उत्कृष्ट ध्वनी अशी पारितोषिके देण्यात आली. सिमरन ठाणेकर यांच्या 'लक्ष्मी-विलास पॅलेस' व पल्लवी पाटील यांच्या 'विचार शाश्वत वसतिगृहांचा' या माहितीपटांना अनुक्रमे उत्कृष्ट छायाचित्रण व उत्कृष्ट संकलन पारितोषिके मिळाली. या महोत्सवासाठी चित्रपट समीक्षक डॉ. अनमोल कोठाडिया व दिग्दर्शक अनुप जत्राटकर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. महोत्सवाच्या आयोजक डॉ. निशा पवार यांनी प्रास्ताविक केले. महोत्सव यशस्वी करण्यासाठी डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे, परशराम पवार यांनी परिश्रम घेतले. पल्लवी पाटील व जावेद तांबोळी यांनी सूत्रसंचालन केले.

12 MAY 2023
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात राजर्षी छत्रपती शाहू महाराज माहितीपट महोत्सव

## माहितीपटांतून उलगडले शाहूंचे कार्य; 'कोल्हापूर ते मिरज रेल्वे' ठरला सर्वोत्कृष्ट

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन विभागातर्फे राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी वर्षानिमित्त 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय माहितीपट महोत्सव २०२३'चे गुरुवारी आयोजन करण्यात आले होते.



माहितीपट महोत्सवातील पुरस्कार विजेत्यांसह प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, अनुप जत्राटकर, अनमोल कोठाडिया, डॉ. विलास शिंदे, डॉ. निशा पवार.

विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात झालेल्या या महोत्सवात शाहू महाराजांच्या योगदानावर प्रकाश टाकणारे १९ माहितीपट नोंदवले होते. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील अध्यक्षस्थानी होते, तर प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे प्रमुख उपस्थित होते.

विजेत्या पाच माहितीपटांचे स्क्रीनिंग यावेळी करण्यात आले. महोत्सवातील विजेते अनुक्रमे, चेतन सूर्यवंशी यांचा 'कोल्हापूर ते मिरज रेल्वे', समृद्धी पाटील यांचा 'साठमारी' असे आहेत. सोनाली हुंबरे यांचा 'मोतीबाग तालीम'ला विशेष परीक्षक पुरस्कार व उत्कृष्ट ध्वनी अशी पारितोषिके देण्यात आली. सिमरन ठाणेकर यांच्या 'लक्ष्मी-विलास पॅलेस' व पल्लवी पाटील यांच्या 'विचार शाश्वत वसतिगृहांचा' या माहितीपटांना अनुक्रमे उत्कृष्ट छायाचित्रण व उत्कृष्ट संकलन पारितोषिके मिळाली.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. महोत्सवाच्या आयोजक डॉ. निशा पवार यांनी प्रास्ताविक केले. महोत्सवासाठी चित्रपट समीक्षक डॉ. अनमोल कोठाडिया, दिग्दर्शक अनुप जत्राटकर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

महोत्सव यशस्वी करण्यासाठी डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे, परशराम पवार यांनी परिश्रम घेतले. पल्लवी पाटील व जावेद तांबोळी यांनी सूत्रसंचालन केले.

12 MAY 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'रंग कला-संस्कृती'तून राजर्षी शाहूंना अभिवादन

कोल्हापूर, ता. ११ : 'लोकराजा राजर्षी शाहू महाराज स्मृती सांगता आणि कृतज्ञता पर्वानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे झालेल्या 'रंग कला-संस्कृतीचे' कार्यक्रमात अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी बहारदार सादरीकरण केले.

संगीत व नाट्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. अंजली निगवेकर यांच्या हस्ते सुरुवातीला राजर्षी शाहू महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पांजली वाहण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात भरतनाट्यम् विभागाच्या विद्यार्थिनींच्या गणेशवंदनेने झाली. त्यानंतर अधिविभागाचे विद्यार्थी रुद्र कुलकर्णी यांनी राग गुर्जरी तोडी, धनाजी पाटील यांनी एकल तबलावादन सादर केले. प्रीतीसुरी दुधारी, निर्गुणाचा संग, हे श्याम सुंदरा, बोलावा विठ्ठल, अंदाज आरशाचा, मधुकर वणवण फिरत करी आदी गाण्यांचे धनश्री गाडगीळ, प्रियांका मिरजकर, प्रतीक्षा पवार यांनी सादरीकरण केले. या वेळी मराठी अधिविभागाचे विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, रणधीर शिंदे, इंग्रजी विभागाचे प्रा. प्रभंजन माने आदी उपस्थित होते. विनोद ठाकूर-देसाई यांनी प्रास्ताविक केले. अतुल परीट यांनी सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमात गौरी कुलकर्णी, डॉ. सचिन कचोटे (हार्मोनियम) व सौरभ सनदी (तबला) यांनी साथ केली.

## 'स्वररंग'चे दुसरे पुष्प

या कार्यक्रमात आज सुरुवातीला विद्यार्थ्यांनी कथक नृत्य तसेच तबल्याच्या विद्यार्थ्यांनी युगल तबलावादन सादर केले. त्यानंतर ज्येष्ठ संगीतकार पं. श्रीनिवास खळे व प्रसिद्ध गायक अरुण दाते यांची अनेक सदाबहार गाणी संगीत विभागाच्या विद्यार्थ्यांनी सादर केली. नाट्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'एक मुलाखत' या उपहासात्मक प्रहसनाला प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.




कोल्हापूर : 'लोकराजा राजर्षी शाहू महाराज स्मृती सांगता व कृतज्ञता पर्वानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे 'रंग कला - संस्कृतीचे' या कार्यक्रमाचे अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी बहारदार सादरीकरण केले.

तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संगीत आणि नाट्यशास्त्र विभागात राजर्षी शाहू महाराज स्मृती शताब्दी वर्षाच्या समारोपानिमित्त गायनाचे कार्यक्रम सादर करण्यात आले.

# सांगितिक कार्यक्रमाने राजर्षी शाहू महाराजांना अभिवादन

- **शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागात 'रंग कला संस्कृतीचे' कलाविष्कार**

प्रतिनिधी
कोल्हापूर

'लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी सांगता व कृतज्ञता पर्व २०२३ निमित्त शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने 'रंग कला संस्कृतीचे' या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सांगितिक कार्यक्रमाच्या माध्यमातून या अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी बहारदार सादरीकरण करत राजर्षी शाहू महाराजांना अभिवादन केले.

संगीत व नाट्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. अंजली निगवेकर यांच्या हस्ते कार्यक्रमाच्या सुरवातीला राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार व पुष्पांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाची सुरवात भरतनाट्यम विभागाच्या विद्यार्थीनींच्या गणेशवंदनेने झाली. त्यानंतर अधिविभागाचे विद्यार्थी रूद्र कुलकर्णी यांनी राग गुर्जरी तोडी, धनाजी पाटील यांनी एकल तबला वादन सादर केले. प्रीतीसुरी दुधारी, निर्गुणाचा संग, हे श्याम सुंदरा, बोलावा विठ्ठल, अंदाज आरशाचा, मधुकर वनवन फिरत करी इत्यादी गाण्यांचे कु. धनश्री गाडगीळ, प्रियांका मिरजकर व प्रतिक्षा पवार या विद्यार्थीनींनी अतिशय रंगतदार सादरीकरण केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांनी केले. सूत्रसंचलन अतुल परिट यांनी केले. या संपूर्ण कार्यक्रमात हार्मोनियमची साथ डॉ. सचिन कचोटे, गौरी कुलकर्णी, तबल्याची साथ सौरभ सनदी यांनी केली. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात रंगलेल्या यावेळी मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. नंदकुमार मोरे, प्रा. डॉ रणधीर शिंदे व इंग्रजी विभागाचे प्रा. डॉ. प्रभंजन माने सर्व शिक्षक वविद्यार्थी, पालक उपस्थित होते.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात 'स्वररंग' उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे गुरुवारी (दि. ११) आयोजित केलेला 'स्वररंग - पुष्प दुसरे' हा सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात झाला.

विद्यार्थ्यांनी कथ्थक नृत्य तसेच तबल्याच्या विद्यार्थांनी युगल तबलावादन सादर करून रसिकांना खिळवून ठेवले. त्यानंतर ज्येष्ठ संगीतकार पं. श्रीनिवास खळे व प्रसिद्ध गायक अरुण दाते यांची अनेक सदाबहार गाणी संगीत विभागाच्या विद्यार्थ्यांनी सादर केली.

नाट्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'एक मुलाखत' या उपहासात्मक प्रहसनाला प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शिक्षक गौरी कुलकर्णी यांनी हार्मोनिअमची तर तबल्याची साथसंगत संदेश गावंदे व विक्रम परिट यांनी केली.

आसावरी कुलकर्णी हिने निवेदन केले. यावेळी सहायक प्राध्यापक डॉ. विनोद ठाकूरदेसाई, पद्मश्री बागडेकर, प्रज्ञा रास्ते, सौरभ सनदी, भाग्यश्री कालेकर, डॉ. शिवानी ढेरे, डॉ. संजय तोडकर उपस्थित होते.

पुण्यनगरी

# विद्यापीठात रंगला 'स्वररंग'

कोल्हापूर : विद्यार्थ्यांमधील विविध कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे विभागातील विद्यार्थी व पालकांसाठी 'स्वररंग-पुष्प दुसरे' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांनी कथ्थक नृत्य, तसेच तबला शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी युगल तबला वादन सादर केले. त्यानंतर ज्येष्ठ संगीतकार पं. श्रीनिवास खळे व प्रसिद्ध गायक अरुण दाते यांची अनेक सदाबहार गाणी संगीत विभागाच्या विद्यार्थ्यांनी सादर केली. नाट्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'एक मुलाखत' या उपहासात्मक प्रहसनाला प्रेक्षकांनी उत्स्फूर्त हास्य प्रतिसाद दिला. या कार्यक्रमाला विभागातील शिक्षक गौरी कुलकर्णी यांनी हार्मोनिअम साथ केली, तर तबल्याची साथसंगत संदेश गावंदे व विक्रम परीट या शिक्षकद्वयांनी केली. निवेदन आसावरी कुलकर्णी हिने केले तर ध्वनिव्यवस्था मल्हार जोशी यांनी सांभाळली. कार्यक्रमास विभागातील सहायक प्रा. डॉ. विनोद ठाकूर देसाई, पद्मश्री बागडेकर, प्रज्ञा रास्ते, सौरभ सनदी, भाग्यश्री कालेकर, डॉ. शिवानी ढेरे, डॉ. संजय तोडकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


12 MAY 2023
सकाळ

# संशोधकांनी शोधली पालीची नवी प्रजात

## तमिळनाडूमध्ये आढळ; शोध गटात कोल्हापुरातील विद्यार्थ्यांचा सहभाग

कोल्हापूर, ता. ११ : तमिळनाडू मधील थुतुकुडी (तुतिकोरीन) जिल्ह्यातून पणरिषी बोटांच्या पालीच्या नव्या प्रजातीचा शोध लावण्यात भारतातील संशोधकांना यश आलेले आहे. हेमिडॅक्टिलस क्वार्टझाइटीकोलस (क्वार्टझाइट ब्रुकीश गेको) असे तिचे नामकरण केले आहे. या संशोधन गटात कोल्हापुरातील विद्यार्थ्यांचा सहभाग घेतला.

पृष्ठभागाला धरून ठेवण्यासाठी आवश्यक असणारे बोटांवरील लॅमेले विभागलेले असल्यामुळे या प्रजातीचा समावेश हेमिडॅक्टिलस या पोटजातीत केलेला आहे आणि गारगोटीसदृश्य खडकांच्या (क्वार्टझाइट) अधिवासात आढळत असल्यामुळे या प्रजातीला क्वार्टझाइटीकोलस असे



नाव दिलेले आहे.

या संशोधनामध्ये ठाकरे वाईल्डलाईफ फाउंडेशनचे संशोधक अक्षय खांडेकर, तेजस ठाकरे, ईशान अगरवाल, स्वप्नील पवार, सत्पाल गंगलमाले, विवेक वाघे आणि रेप्टाईल कॉन्झर्वेशन ऑफ इंडियाचे रामेश्वरम मरीआप्पन यांचा समावेश आहे. हेमिडॅक्टिलस या पोटजातीतील पालींच्या बोटांच्या

> “या नव्या प्रजातीच्या पाली शुष्क पानझडी वनांनी व्यापलेल्या छोट्या टेकड्यांवरील क्वार्टझाइटच्या खडकांवरती सापडतात. या टेकड्यांची समुद्रसपाटीपासूनची उंची ३५० मीटर पेक्षा कमी आहे. ही प्रजाती निशाचर असून छोटे कीटक हे त्यांचं प्रमुख खाद्य आहे. क्वार्टझाईटच्या उघड्या खडकांवरती भक्ष्य पकडण्यासाठी, या पाली रात्री बाहेर पडतात आणि दिवसा खडकांच्या भेगांमधे विश्रांती घेतात. पालींच्या या नव्या शोधामुळे, शुष्क पानझडी वनांनी व्यापलेल्या छोट्या टेकड्यांच्या आणि क्वार्टझाइट खडकांच्या अधिवासाचे महत्त्व नव्याने अधोरेखित झालेले आहे.
>
> **- अक्षय खांडेकर,**
> ठाकरे वाईल्डलाईफ, शिवाजी विद्यापीठ पीएच.डी.चे विद्यार्थी

खाली असणारे लॅमेले वृक्षांच्या पानांवर असणाऱ्या रेषांशी साधर्म्य साधतात म्हणून त्यांना मराठीमधे 'पणरिषी बोटांच्या पाली' असे संबोधलेले आहे. घरांमध्ये भिंतीवर दिसणाऱ्या पाली याच पोटजातीत सामावलेल्या आहेत.

ठाकरे वाईल्डलाईफ फाऊंडेशनकडून सुरु असलेल्या भारतीय द्वीपकल्पामधील पालींच्या सर्व्हेक्षणादरम्यान ही पाल प्रथमतः आढळली. पाठीवरील ट्युबरकलची वैशिष्टपूर्ण रचना आणि त्यांचा आकार यावरून प्रथमदर्शनीच ही पाल इतर कोणत्याही हेमिडॅक्टिलस पोटजातीतील प्रजातींपेक्षा अत्यंत वेगळी असल्याचे लक्षात आले.

जनसंपर्क कक्ष

12 MAY 2023 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'मुद्रितशोधकांना रोजगाराच्या मोठ्या संधी'

कोल्हापूर : साहित्याचे निर्दोष मुद्रितशोधन करणाऱ्या तज्ज्ञांची खूप कमतरता आहे. त्यामुळे मुद्रित शोधण्याच्या क्षेत्रात स्वयंरोजगाराची मोठी संधी उपलब्ध आहे. नाइट कॉलेजने मुद्रितशोधन प्रमाणपत्र कोर्स घेऊन विद्यार्थ्यांना भाषिक प्रगल्भतेबरोबरच करिअरचे मोठे दालन उपलब्ध करून दिले आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक प्रा. डॉ. आर. जी. पवार यांनी व्यक्त केले.

नाइट कॉलेजच्या मराठी विभागाच्या वतीने मुद्रितशोधन प्रमाणपत्र अभ्यासक्रम कोर्स घेण्यात आला. या कोर्सच्या सांगता समारंभप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून पवार बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र. प्राचार्य डॉ. एस. जे. फराकटे होते. मराठी विभागप्रमुख डॉ. अरुण शिंदे यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य श्रीधर हेरवाडे व बाजीराव जठार यांनी कोर्सला अध्यापन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 MAY 2023 तरूण भारत

# मुद्रितशोधकांना रोजगाराची संधी

## शिवाजी विद्यापीठातील आजीवन : अध्ययन व विस्तार संचालक डॉ. आर.जी.पवार यांचे मत

प्रतिनिधी
कोल्हापूर

ग्रंथ, नियतकालिके, वृत्तपत्रे व छापील साहित्य मोठ्या प्रमाणात प्रकाशित होत आहे. अशा साहित्याचे निदोष मुद्रितशोधन करणाऱ्या. तज्ज्ञांची खूप कमतरता आहे. मुद्रितशोधन प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्यांना रोजगाराची संधी आहे, असे मत शिवाजी विद्यापीठातील आजीवन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. आर. जी. पवार यांनी व्यक्त केले.

नाईट कॉलेजमधील मराठी विभागाच्यावतीने मुद्रितशोधन प्रमाणपत्र अभ्यासक्रम कोर्सच्या सांगता समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. एस. जे. फराकटे होते. डॉ. पवार म्हणाले, अजीवन अध्ययन विभागातर्फे विविध अभ्यासक्रम शिकवले जातात. या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून नोकरीची संधी निर्माण होते. कौशल्याधिष्ठीत शिक्षणामुळे आपल्या व्यक्तीमत्वाचा ठसा उमटवू शकतो, असे मत पवार यांनी व्यक्त केले.

डॉ. अरूण शिंदे यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य श्रीधर हेरवाडे व बाजीराव जठार यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन पंडीत कंदले यांनी केले. आभार विजय कांबळे यांनी मानले. यावेळी डॉ. प्रशांत गायकवाड, अमित मेधावी, भरत कुंभार, साताप्पा माळी आदी उपस्थित होते.

लोकमत

# ५८३ विद्यार्थ्यांनी दिली विद्यापीठाची प्रवेश परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात २०२३-२०२४ या शैक्षणिक वर्षामध्ये विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठातील विविध अधिविभागात पदव्युत्तर अभ्यासक्रमांना नियमित प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रवेश परीक्षा गुरुवारी संपल्या.

८ मे पासून या परीक्षांना प्रारंभ झाला होता. ऑफलाईन पद्धतीने झालेल्या या परीक्षांसाठी कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, बेळगाव या जिल्ह्यांमध्ये केंद्र स्थापन केली होती. गुरुवारी (दि.११) १६ केंद्रांवर एमएसडब्ल्यू, बीएस्सी, एमएस्सी (पाच वर्षांचा इन्टिग्रेटेड), एम. ए, एमएस्सी यांसह विविध सहा अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा सुरळीत पार पडल्या. या परीक्षेसाठी ५८३ विद्यार्थी उपस्थित होते.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या सहा अभ्यासक्रमांचे निकाल घोषित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. बी. व्होक. (न्यूट्रिशन अँड डायटस्), बी. व्होक. (डिप्लोमा इन मेडिकल), बी. व्होक. (केन ॲग्री शुगरटेक) आदी सहा अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत.